**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**
यांचे कार्यालय, तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे 411 001

क्र.का. 5/मुद्रांक20/स्पष्टीकरण/प्र.क्र. 06/20/146/20, दि.27/04/2020

**विषय: कोरोना विषाणू प्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या कालावधीत बँकाच्या वित्तपुरवठाविषयक कामकाजामध्ये निष्पादित होणाऱ्या दस्तांचे मुद्रांक शुल्क भरण्यात येणाऱ्या अडचणींविषयी वनोटीस ऑफ इंटिमेशन फाईलींग साठी मुदतीबाबत.**

**परिपत्रक:**

**प्रस्तावना:** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत, त्याचाच भाग म्हणून दि. 23/04/2020 पासून महाराष्ट्रात लॉकडाऊन घोषित करण्यात आले असून सद्यस्थितीत लॉकडाऊनची मुदत दि.03/05/2020 पर्यंत आहे.

बँका किंवा बँकेतर वित्तीय संस्था यांच्या वित्तपुरवठाविषयक कामकाजामध्ये विविध दस्तऐवज निष्पादित होत असतात व त्यांना मुद्रांक शुल्क देय असते. त्यापैकी जे दस्त नोंदणी करणे अनिवार्य प्रकारातील आहेत (उदा. साधे गहाणखत) त्यांना शासनाच्या GRAS प्रणालीद्वारे ऑनलाइन इ-प्रदान (e-Challan) करणे शक्य आहे, त्यामुळे त्या प्रकारच्या दस्तांच्या बाबत विशेष अडचण येत नाही. मात्र जे दस्त नोंदणी करणे अनिवार्य प्रकारातील नाहीत (उदा.हायपोथिकेशन, पर्सनल लोन अग्रीमेंट ) त्यांना शासनाच्या GRAS प्रणालीद्वारे ऑनलाइन इ-प्रदान (e -Challan) करता येत नाही, अशा दस्तांचे मुद्रांक शुल्क भरण्यासाठी पुढील पर्याय उपलब्ध आहेत:

- रु. 500/- पर्यंत मुद्रांक विक्रेता किंवा कोषागारकडून मुद्रांक कागद, किंवा
- रु. 5000/- पर्यंत फ्रँकिंग विक्रेताकडून फ्रँकिंग,
- रु. 100/- च्या वर रक्कम असेल तर विशिष्ट बँकांकडून ESBTR

लॉकडाऊनमुळे उपरोक्त तिन्ही प्रकारच्या विक्रेत्यांकडून मुद्रांक/फ्रँकिंग/ESBTR मिळविणे बँकांना किंवा त्यांच्या ग्राहकांना (व्यापक अर्थाने कोणत्याही नागरिकाला) शक्य होत नाही. त्यामुळे मुद्रांक उपलब्ध नसल्याचे कारणास्तव संबंधित दस्त निष्पादित करणे शक्य होणार नाही व त्यामळे बँकांचे वित्त पुरवठाविषयक कामकाज खोळंबण्याची शक्यता आहे ही बाब लोकहिताचे दृष्टीने योग्य होणार नाही.

अशा परिस्थितीत बँका किंवा बँकेतर वित्तीय संस्था यांच्या वित्तपुरवठाविषयक कामकाजामध्ये निष्पादित होणाऱ्या विविध दस्तऐवजांपैकी, नोंदणी करणे अनिवार्य प्रकारातील नाहीत असे दस्त (उदा.हायपोथिकेशन, पर्सनल लोन अग्रीमेंट इ.) (यापुढे ज्यांचा उल्लेख 'असे दस्त' असा करण्यात आला आहे) लॉकडाऊनचे कालावधीत निष्पादित करण्यात आले असल्यास/करावयाचे झाल्यास त्याचे मुद्रांक शुल्क कसे भरता येईल याबाबत काही बँका/बँकेतर वित्तीय संस्था/नागरिक यांचेकडुन या कार्यालयाकडे विचारणा होत आहे.त्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना/स्पष्टीकरण निर्गमित करण्यात येत आहे:-

Scanned with CamScanner

1) महाराष्ट्र, मुद्रांक अधिनियमाचे कलम 17 मध्ये मुद्रांक शुल्क भरण्यासाठी पुढील प्रमाणे कालमर्यादा विहित आहे :-

*17. **Instruments executed in State.** - All instruments chargeable with duty and executed by any person in this State shall be stamped before or at the time of execution or immediately thereafter or on the next working day following the day of execution:*

General Clauses Act 1897 चे कलम 10 मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

*10. **Computation of time.**(1) Where, by any Central Act or Regulation made after the commencement of this Act, any act or proceeding is directed or allowed to be done or taken in any Court or office on a certain day or within a prescribed period, then, if the Court or office is closed on that day or the last day of the prescribed period, the act or proceeding shall be considered as done or taken in due time if it is done or taken on the next day afterwards on which the Court or office is open.*

तसेच Maharashtra General Clauses Act चे कलम 11 मध्ये सुद्धा पुढीलप्रमाणे तरतूद आहे

*11. Where, by any Bombay Act or Maharashtra Act made after the commencement of this Act, any act or proceeding is directed or allowed to be done or taken in any Court or office on a certain day or within a prescribed period, then, if the Court or office is closed on that day or the last day of the prescribed period, the act or proceeding shall be considered as done or taken in due time if it is done or taken on the next day afterwards on which the Court or office is open :*

या तरतुदींचा एकत्रीत विचार केला असता, लॉकडाऊनच्या कालावधीत असे दस्त ज्या जिल्ह्यात निष्पादित करण्यात आले आहेत, त्या जिल्ह्यातील लॉकडाऊनचा कालावधी संपल्यानंतरच्या पहिल्या कामकाजाचे दिवशीपर्यंत अशा दस्ताचे मुद्रांक शुल्क भरले तरी ते उपरोक्त कलम 17 प्रमाणे योग्य मुदतीत भरले असे मानण्यात येईल.

2) लॉकडाऊनच्या कालावधी निष्पादित करण्यात आलेल्या अशा दस्तांचे मुद्रांक शुल्क वरील मुदतीमध्ये (त्या जिल्ह्यातील लॉकडाऊनचा कालावधी संपल्यानंतरच्या पहिल्या कामकाजाचे दिवशीपर्यंत) भरणे शक्य झाले नाही, तर संबंधिताना अशा दस्ताचे मुद्रांक शुल्क भरण्यासाठी मुद्रांक अधिनियमाचे कलम 40 प्रमाणे अर्ज करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

*40. If any instrument chargeable with duty and not duly stamped, not being an instrument chargeable with a duty of twenty naye paise or less is produced by any person of his own motion before the Collector within one year from the date of its execution or first execution, and such person brings to the notice of the Collector the fact that, such instrument is not duly*

Scanned with CamScanner

*stamped and offers to pay to the Collector the amount of the proper duty, or the amount required to make up the same, and the Collector is satisfied that the omission to duly stamp such instrument has been occasioned by accident, mistake or urgent necessity he may instead of proceeding under sections 33 and 39, receive such amount and proceed as next hereinafter prescribed with the prior approval of the Additional Controller of Stamps, Mumbai for the areas in Mumbai City and Mumbai Suburban Districts and for the other areas the Deputy Inspector General of Registration and Deputy Controller of Stamps.*

असा अर्ज त्या जिल्ह्यातील लॉकडाऊन संपल्यापासून एका महिन्याचे आत (मात्र दस्त निष्पादनापासून एक वर्षाच्या आत) मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केलेला असल्यास व त्याचवेळी मुद्रांक शुल्क भरण्याची तयारी असल्यास, मुद्रांक जिल्हाधिकारी *the omission to duly stamp such instrument has been occasioned by accident, mistake or urgent necessity* या अटीची पुर्तता झाली आहे असे इतर कोणत्याही चौकशी/कागदोपत्री पुराव्याशिवाय मान्य करतील व यथास्थिती नोंदणी उपमहानिरीक्षक किंवा अपर मुद्रांक नियंत्रक यांची पुर्व मान्यता घेऊन, कमी पडलेले मुद्रांक शुल्क विनादंड वसूल करतील.

या ठिकाणी हे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा दस्ताचे बाबत त्या जिल्ह्यातील लॉकडाऊन संपल्यापासून एका महिन्याचे नंतर (मात्र दस्त निष्पादनापासून एक वर्षाच्या आत) मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केलेला असल्यास गुणवत्तेवर योग्य तो निर्णय घेण्याचा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचा (व पुर्व मान्यता देण्याचा नोंदणी उपमहानिरीक्षक किंवा अपर मुद्रांक नियंत्रक यांचा) अधिकार अबाधित राहील.

3) महाराष्ट्र, मुद्रांक अधिनियमाचे कलम 10 ड नुसार अधिसुचित प्रकारच्या दस्तांसाठी शासनाच्या GRAS प्रणालीद्वारे ऑनलाइन ई-प्रदान (e -Challan) करण्याचा पर्याय उपलब्ध आहे, त्यासाठी विभागाने बँका/ बँकेतर वित्तीय संस्था यांच्याकरिता igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online Services या सदराखाली Section 10D या ठिकाणी ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. त्या सुविधेचा वापर केल्यास बँक/बँकेतर वित्तीय संस्था यांना किंवा त्यांचे ग्राहकांना अशा दस्तांचे मुद्रांक शुल्क ऑनलाईन भरता येईल व प्रस्तावनेमध्ये नमूद अडचण उद्भवणार नाही. तरी सर्व बँक/बँकेतर वित्तीय संस्था यांनी या प्रणालीचा वापर सुरु करावा असे आवाहन त्यांना करण्यात येत आहे.

4) नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 89ब नुसार हक्कलेख निक्षेप पद्धतीच्या गहाण व्यवहारात (Mortgage by way of deposit of title deed/ Equitable Mortgage) जर करारनामा करण्यात आला नसेल, तर कर्ज घेणाऱ्याने कर्ज व्यवहाराची माहिती देणारी सूचना (Notice of Intimation) कर्ज व्यवहाराचे दिनांकापासून 30 दिवसाचे आत दुय्यम निबंधक कार्यालयात फाईल करणे बंधनकारक आहे. जर एखाद्या प्रकरणाचे बाबत सदर 30 दिवसाची कालमर्यादा 'कार्यालय बंद राहण्याचा कालावधी' मध्ये संपुष्टात आल्यास त्या नोटीसचे बाबतीत कायदेशीर स्थिती काय असेल ? अशीही विचारणा होत आहे. या बाबतदेखील वर नमूद केल्याप्रमाणे General Clauses Act मधील

Scanned with CamScanner

तरतूद लागू होईल. म्हणजेच त्या जिल्ह्यातील लॉकडाऊनचा कालावधी संपल्यानंतरच्या पहिल्या कामकाजाचे दिवशी अशा नोटीस दुय्यम निबंधक कार्यालयात फाईल करता येतील.

या ठिकाणी हे देखील नमूद करण्यात येते की, नोटीस ऑफ इंटिमेशन दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष न येता ऑनलाईन फाईल करण्याचा पर्याय उपलब्ध आहे, त्यासाठी विभागाने बँका/ बँकेतर वित्तीय संस्था यांच्याकरिता igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online Services या सदराखाली e-Filing या ठिकाणी ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून दिले आहे, त्या सुविधेचा वापर केल्यास वर नमूद अडचण उद्भवणार नाही. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या उपाययोजनेचा भाग म्हणून साधारण दि. 1 जून 2020 पासून कार्यालयातील प्रत्यक्ष फायलींगची (Physical Filing) पद्धत बंद करण्याचा विभागाचा मानस आहे, तरी सर्व बँक/बँकेतर वित्तीय संस्था यांनी येत्या महिन्याभरात e-Filing प्रणालीचा वापर सुरु करावा असे आवाहन त्यांना करण्यात येत आहे.

तरी सर्व संबधितांनी या सूचनांची योग्य ती नोंद घ्यावी. सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकाच्या व बँकेतर वित्तीय संस्था यांच्याकडे (किमान त्यांच्या जिल्हा मुख्यालयाला) या परिपत्रकाची प्रत तातडीने पोच करावी तसेच ई- फायलिंग सुविधा दि. 1 जून, 2020 पूर्वी उपलब्ध करून घेण्याच्या सूचना द्याव्यात.

इंडियन बँक असोसिशन व राज्य स्तरीय बँकर्स कमिटी यांनादेखील विनंती करण्यात येते कि त्यांनी त्यांचे सभासद बँका व इतर संबंधित यांना या परिपत्रकाची प्रत तातडीने पोच करावी तसेच ई - फायलिंग सुविधा दि. 20 मे 2020 पूर्वी व कलम 10ड ची सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून घेण्याच्या सूचना द्याव्यात.

**(ओमप्रकाश देशमुख)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

1. सर्व बँका/ बँकेतर वित्तीय संस्था ( सह जिल्हा निबंधक यांचे मार्फत )
2. अपर मुद्रांक नियंत्रक,
3. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
4. सर्व सह जिल्हा निबंधक/ मुद्रांक जिल्हाधिकारी
5. सर्व दुय्यम निबंधक ( सह जिल्हा निबंधक यांचे मार्फत )
6. सर्व कार्यसन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय.

प्रत:

1. मा. अपर मुख्य सचिव, महसूल, मुद्रांक व नोंदणी,मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडियन बँक असोसिशन, स्टेडियम हाऊस, ब्लॉक 3, सहावा मजला, चर्चगेट, मुबंई, 400 020
3. कन्व्हेंनर, राज्य स्तरीय बँकर्स कमिटी, बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, शिवाजीनगर

Scanned with CamScanner